नि. फौ. ख. क्र. २१०/२०२२ निशाणी ३८

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – गजानन रिध्दकरण शर्मा

वय – ३० वर्षे, व्यवसाय – खाजगी नोकरी

पत्ता – बिकानेर, राजस्थान

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्री.के.एस.ताकवाले यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. घटना घडली त्यावेळी मी अंबुजा फॅक्टरीच्या समोर निखिल कमलकिशोर खंडेलवाल या कंपनीत मी मॅनेजर म्हणुन कार्यरत होतो. घटना दि. ३१.०५.२०२१ रोजी दुपारी ०२.०० वाजता घडली. दुपारी ०२.०० मला वेअर हाऊसचे सुपरवाईजर श्रीभगवान कायल यांनी मला फोनवर कळविले की, वेअर हाऊसच्या मागील भिंतीला २ x २ फुटाचे छिद्र करुन काही इसमांनी सोयाबीनचे कट्टे चोरुन नेले आहेत. मी वेअर हाऊसमध्ये जावुन सोयाबीनचे कट्टे मोजले असता त्यामध्ये लॉट नं. २४५ मध्ये २१ सोयाबिनचे कट्टे आणि लॉट नं. १४९ मध्ये ३९ सोयाबिनचे कट्टे चोरीला गेल्याचे समजले. त्यानंतर मी बाळापुर पोलीस स्टेशन येथे जावुन रिपोर्ट नोंदविला. आता मला रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३९** देण्यात येत आहे. आता मला प्रथम छापील खबर दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४०** देण्यात येत आहे. दुसऱ्या दिवशी पोलीसांनी येवुन तेथे चौकशी केली आणि पंचनामा केला. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. सुरुवातीला अज्ञात इसमांनी चोरी केली होती. नंतरहुन सदर चोरी ३ इसम आडनाव मेहेंगे यांनी चोरी केल्याचे समजले. आरोपींची पुर्ण नावे माझ्या लक्षात नाही. मी आरोपींना ओळखु शकणार नाही.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.बडगुजर यांच्या मार्फत</u>

२. चोरी झाली त्या दिवशी वेअर हाऊस मध्ये किती माल होता मी आजरोजी सांगु शकत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, घटनेला बरीच वर्ष झाल्याने मला आठवत नाही. दि. ३१.०५.२०२१ रोजी रात्री ०८.०० वाजता मी पोलीस स्टेशन, बाळापुर येथे रिपोर्ट देण्यासाठी गेलो.

प्रश्न – रिपोर्ट देण्यासाठी तुम्हाला इतका उशीर का झाला ?

उत्तर – घटना दुपारी ०२.०० वाजता झाली. त्यानंतर आम्ही पुर्ण वेअर हाऊसची इतर लॉटमध्ये चोरी झाली आहे किंवा नाही याची पडताळणी केली. त्यानंतर फक्त २ लॉट मधुन चोरी झाल्याची खात्री झाल्यानंतर मी रात्री ०८.०० वाजता तक्रार दिली.

मी तक्रार उशीरा देण्याचे कारण पोलीसांना सांगितले होते किंवा कसे मला आठवत नाही.

३. पोलीस दि. ०१.०६.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता आले आणि दुपारी ०१.०० पर्यंत त्यांनी चौकशी केली. सदर चोरीच्या चौकशीकामी पोलीस मी हजर असतांना किती वेळा आले मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वेअर हाऊस मध्ये कोणतीही चोरी झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही मालाची अफरातफर करुन चोरी केली. हे म्हणणे खरे आहे की, सदर चोरीच्या आरोपींना मी आजरोजी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी तक्रार दिलेली असुन आजरोजी खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.08.30 11:16:25 +0530

बाळापूर. (श्रीमती डी. एम. पाटील)
दि.२९/०८/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर

नि. फौ. ख. क्र. २१०/२०२२ निशाणी ४१

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – निवृत्ती रामकृष्ण इंगळे

वय – ४२ वर्षे, व्यवसाय – खाजगी नोकरी

पत्ता – डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्री.के.एस.ताकवाले यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि. ०१.०६.२०२१ रोजी पोलीसांनी मला अंबुजा फॅक्टरी समोरील निखिल खंडेलवाल वेअर हाऊस येथे पंचनाम्यासाठी सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० च्या दरम्यान बोलविले होते. त्यानुसार मी त्या ठिकाणी गेलो. तेथे मी, वेअर हाऊसचे मॅनेजर गजानन शर्मा, किरण सरदार आणि पोलीस कर्मचारी हजर होते. पालीसांनी तेथे पाहणी करुन घटनास्थळाचा पंचनामा केला. आता मला दाखविलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४२** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.बडगुजर यांच्या मार्फत**

२. पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी हजर राहणेकरीता लेखी सुचना दिली नाही. घटना घडली त्यावेळी मी एल.टी.सी. कर्मशिअल कंपनी प्रा. लि. मध्ये कामावर होतो. माझ्या समक्ष वेअर हाऊसमधील मालाचे मोजमाप झाले नाही, किती माल आला व किती गेला त्याचे मोजमाप झाले नाही. मी जाण्यापुर्वी तेथे पोलीस आलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी गेलो त्यावेळी लिखापढी झालेली होती आणि पोलीसांनी माझ्या सहया घेतल्या. माझ्या आणि किरण सरदारच्या सहया पोलीसांनी सोबत घेतल्या.

३. घटनास्थळाच्या चतुःसिमा मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या ठिकाणी नोकरीला असल्यामुळे मी वरिष्ठांच्या सांगण्यावरुन सहया केल्या. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनाम्यातील मजकुर वाचुन पाहिला नाही.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.08.30 11:16:33 +0530

बाळापूर.
दि.२९/०८/२०२५

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर